**नि.फौ.प्र. क्र. ६३/२०२२**
**शासन – वि– महेश व इतर**
**निशाणी क्र. २३**

**<u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक १</u>**

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | – | पुंडलिक लिंगाप्पा राठोड |
| वय | – | ३८ वर्षे, व्यवसाय – गवंडी काम, |
| रा. | – | दहिवडी, ता. माण, जि. सातारा. |

(आरोपी व आरोपीचे वकिल गैरहजर. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३०९ प्रमाणे पुरावा सुरु.)

**<u>सरतपासणी फौ.प्र.संहिता कलम २७७–अ प्रमाणे सहा. सरकारी अभियोक्ता श्री. ए.व्ही. रजपुत साहेब यांच्याव्दारे</u>**

मी एकतानगर, दहिवडी येथे अशोक आण्णा घनवट यांच्या घरी भाडयाने राहत होतो. दि. २७/०९/२०२१ रोजी आमच्या घरी कोणीही नव्हते. त्यामुळे तेथे चोरी झाली होती. दि. २६/०९/२०२१ रोजी मी रात्री माझ्या आईकडे झोपायला गेलो होतो व दुस–या दिवशी मला घरमालकाचा फोन आला की, घरात चोरी झाली आहे. मी घरी येवून पाहिले असता घराचा दरवाजा उघडा होता व कपाटातील वस्तु अस्थाव्यस्त पडलेल्या होत्या. माझ्या घरातून सोन्याचे गंठण ३० ग्रॅम वजनाचे, सोन्याचे नेकलेस १३ ग्रॅम वजनाचे, सोन्याचे झुबे–फुले ८ ग्रॅम वजनाचे, चांदीच्या पटया आठ भार व रोख रक्कम रुपये ९० हजार एकुण र.रु. ३,२४,३००/– रुपयांचा मुद्देमाल चोरीला गेला होता. त्यामुळे मी अज्ञात इसमाच्या विरुध्द फिर्याद नोंदविली.

०२. आता मला दाखविण्यात आलेली फिर्याद तीच आहे. त्यावर माझी सही

आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. तसेच, त्या अनुषंगाने छापील फिर्याद देखील अभिलेखावर हजर आहे. त्यातील मजकूर देखील खरा व बरोबर आहे. फिर्याद **निशाणी २४** व छापील फिर्याद **निशाणी २५** वर आहे.

०३. फिर्याद दिल्यानंतर पोलीस आमच्या घरी घटनास्थळ पंचनामा करणेसाठी आले होते. तो पंचनामा **निशाणी २६** प्रमाणे आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. तसेच, त्याचे छायाचित्रे **निशाणी २७ व २८** आहेत. त्यानंतर दि. ०६.०७.२०२२ रोजी पोलीसांचा फोन आला व चोर सापडले आहेत असे समजले. पोलीसांनी माझा चोरीचा माल देखील सापडला आहे असे सांगितले. मला न्यायालयाच्या आदेशाने १३ ग्रॅमचा नेकलेस व ८ ग्रॅमचे झुबे–फुले मिळाले. इतर मुद्देमाल मिळाला नाही. त्यानंतर पोलीसांनी माझा पुरवणी जबाब नोंदविला. पोलीसांनी चोरी करणा–या लोकांची नावे सांगितली होती. त्यामध्ये महेश भोसले, अवघडे, माने व इतर असे नावे होती.

**आरोपी व त्यांचे वकिल गैरहजर. सबब, प्रकरण विना उलटतपास पुढे चालविणेत येत आहे.**

उलटतपास–पूर्ण.
फेरतपास–नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

GANESH DINKAR PATIL (LANDBALE)
Digitally signed by GANESH DINKAR PATIL (LANDBALE)
Date: 2023.12.18 17:42:17 +0530

**(ग.दि. पाटील)**

दि. १८/१२/२०२३

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दहिवडी.

नि.फौ.प्र. क्र. ६३/२०२२

शासन – वि– महेश व इतर

निशाणी क्र. २९

**<u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक २</u>**

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | – | लक्ष्मण बाबु माने |
| वय | – | ७१ वर्षे, व्यवसाय – सेवानिवृत्त, |
| रा. | – | एकतानगर, दहिवडी, ता. माण, जि. सातारा. |

(आरोपी व आरोपीचे वकिल गैरहजर. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३०९ प्रमाणे पुरावा सुरु.)

**<u>सरतपासणी फौ.प्र.संहिता कलम २७७–अ प्रमाणे सहा. सरकारी अभियोक्ता</u>**

**<u>श्री. ए.व्ही. रजपुत साहेब यांच्याव्दारे</u>**

दि. २७/०९/२०२१ रोजी पोलीसांनी मला फिर्यादीच्या घरी पंचनामा करणेकरीता बोलविले होते. ते घर देखील आमच्याच परिसरातील अशोक घनवट यांचे असून ते भाडयाने दिले होते. पोलीसांनी तेथे दिसत्या परिस्थितीप्रमाणे पंचनामा तयार केला. तेथे पाहून चोरी झालेली होते असे लक्षात आले. त्याबाबत सविस्तर घटनास्थळ पचंनामा पोलीसांनी तयार केला व फोटो काढले. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. तो पंचनामा नि. २६ असून छायाचित्रे निशाणी २७ व २८ वर आहेत.

**आरोपी व त्यांचे वकिल गैरहजर. सबब, प्रकरण विना उलटतपास पुढे चालविणेत येत आहे.**

उलटतपास–पूर्ण.

फेरतपास–नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

GANESH DINKAR PATIL (LANDBALE)

Digitally signed by GANESH DINKAR PATIL (LANDBALE)
Date: 2023.12.18 17:42:30 +0530

**(ग.दि. पाटील)**

दि. १८/१२/२०२३ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दहिवडी.

**नि.फौ.प्र. क्र. ६३/२०२२**

**शासन – वि– महेश व इतर**

**निशाणी क्र. ३०**

**<u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ३</u>**

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | – | अशोक आण्णा घनवट |
| वय | – | ५४ वर्षे, व्यवसाय – गवंडीकाम, |
| रा. | – | एकतानगर, दहिवडी, ता. माण, जि. सातारा. |

(आरोपी व आरोपीचे वकिल गैरहजर. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३०९ प्रमाणे पुरावा सुरु.)

**<u>सरतपासणी फौ.प्र.संहिता कलम २७७–अ प्रमाणे सहा. सरकारी अभियोक्ता</u>**

**<u>श्री. ए.व्ही. रजपुत साहेब यांच्याव्दारे</u>**

फिर्यादी आमच्याकडे भाडयाने रहायला होते. दि. २७/०९/२०२१ रोजी त्यांच्याकडे चोरी झाली होती व मी त्यांना फोनद्वारे सदरची बाब कळविली. त्यांनी स्वतः येवून घरी पाहिले असता कपाट उचकलेले होते व वस्तु इतरत्र पडलेल्या होत्या. त्यानंतर त्यांनी पोलीसांत तक्रार दिली. त्यांचे सोने व रोख रक्कम चोरीला गेल्याचे मला सांगितले होते. माझा दोनवेळा पोलीसांनी जबाब नोंदविला. त्यांच्या चोरीला गेलेल्या वस्तु सापडल्याचे मला नंतर कळाले होते. त्यावेळी दुसरा जबाब नोंदविला होता.

**आरोपी व त्यांचे वकिल गैरहजर. सबब, प्रकरण विना उलटतपास पुढे चालविणेत येत आहे.**

उलटतपास–पूर्ण.

फेरतपास–नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

GANESH DINKAR PATIL (LANDBALE)

Digitally signed by GANESH DINKAR PATIL (LANDBALE) Date: 2023.12.18 17:42:40 +0530

**(ग.दि. पाटील)**

दि. १८/१२/२०२३

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दहिवडी.